दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १६४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१४ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



पनवेलमधील मार्केटचा राजा नावाने प्रसिद्ध असलेल्या महात्मा ज्योतीबा फुले हातगाडी संघटना श्री गौरा गणपती गणेशोत्सव निमित्त लालबागच्या राजाची प्रतिकृती असलेली भव्य दिव्य गणेश मुर्ती. यंदा मंडळाचे ३० वे वर्ष असून पनवेल येथील जुने भाजी मार्केट येथे गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. (छाया : चंद्रशेखर भोपी)

## उरणमध्ये अतिवृष्टीमुळे घराची भिंत पडली ; आई व दोन मुले जखमी

**दै.रायगड नगरी । उरण**

**अतिवृष्टीमुळे करंजा सातघर येथील रहिवाशांच्या राहत्या घरावर कंम्पाऊंड वालची भिंत पडल्याची घटना घडली. या घटनेत बेडरूममध्ये झोपलेली आई व दोन मुले जखमी झाले असून त्यांच्या वर नवीमुंबई येथील डि.वाय.पाटील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**



मिळालेल्या माहितीनुसार चाणजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील करंजा सातघर येथील रहिवासी महेंद्र पाटील यांच्या राहत्या घरांवर अतिवृष्टीमुळे कंपाऊंड वॉलची भिंत पडल्याची घटना घडली. सदर घटना ही घडल्याने घरातील बेडरूममध्ये झोपलेल्या सौ. संगिता महेंद्र पाटील व कुणाळ, दिपेश ही दोन मुले गंभीररीत्या जखमी झाले आहेत. सदर जखमींवर नवीमुंबई येथील डि.वाय.पाटील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या घटनेची माहिती मिळताच चाणजे ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच अमित भगत, ग्रामविकास अधिकारी दिलीप तुरे, तलाठी तेजस चौरले, मंगेश थळी यांनी घटनास्थळी भेट देऊन जोखमीची विचारणा करुन नूकसानीचे पंचनामे सुरू केले आहेत. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या रहिवाशांना तातडीने उपचार व मदत मिळावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

## पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते यांच्या मागणीला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आरोग्य विभागातील कोविड काळात रुजू केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी पनवेल महानगरपालिका आरोग्य विभागात कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते अजित पवार, आरोग्य मंत्री तानाजी सावंत तसेच पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त ह्यांच्या पत्राद्वारे ९ सप्टेंबर २०२२ रोजी पनवेल पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे केली होती. १२ सप्टेंबर रोजी झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत राज्यात आगामी काळात सार्वजनीक आरोग्य विभागात भरण्यात येणाऱ्या ७ हजार



पदांसाठी कोविड काळात सेवा दिलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांचे गुणांकन करून त्यांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे निर्णय घेण्यात आले. त्यामुळे माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्या मागणीला यश आले आहे.

देशावर कोरोना ह्या रोगाचे संकट ओढवले होते तेव्हा आरोग्य सेवेत स्वतः च्या आणि कुटुंबियांच्या जीवावर बेतून नागरिकांचे प्राण

...//२


देशाच्या सीमेवर भारतीय जवान स्वतःच्या जीवाची बाजी लावून लढत असतो. त्याप्रमाणे कोरोना काळात हे आरोग्य सेवक लढत होते. त्यांना त्यांच्या सेवेचे फळ मिळावे याकरिता मी केलेल्या मागणीचा प्रस्ताव पालिका प्रशासनाने तातडीने तयार करून आरोग्य सेवकांना नोकरीत कायम करावे.

**-प्रितम जनार्दन म्हात्रे, मा.विरोधी पक्ष नेता, पनवेल महानगरपालिका**

## जूनपर्यंत प्रकल्प महाराष्ट्रात होता, मग सरकार बदलताच गुजरातला कसा गेला : आदित्य ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पुण्यातील तळेगाव येथे नियोजित असलेला वेदांत आणि फॉक्सकॉन कंपनीचा प्रकल्प गुजरातला गेल्यावरुन शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर आगपाखड केली. हा प्रकल्प महाराष्ट्रात येणार असल्याचे निश्चित झाले होते. वेदांत कंपनीचे मालक अनिल अग्रवाल यांनी ट्विट करुन तशी माहितीही दिली होती. पण सरकार बदलल्यानंतर एका महिन्यात अशा काय गोष्टी घडल्या की, 'फॉक्सकॉन' प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेला, असा सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. ते मंगळवारी



मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकारपरिषदेत बोलत होते.

यावेळी आदित्य ठाकरे यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर टीकास्त्र सोडले. महाराष्ट्रातील अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे हा प्रकल्प राज्याबाहेर गेला का, असा प्रश्न आदित्य यांना विचारण्यात आला. यावर

...//२

## संक्षिप्त...

### १५ सप्टेंबरचा टॅक्सी चालकांचा संप मागे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार मुंबई टॅक्सीमेन यूनियन संघटनेशी चर्चा केली. आजच्या झालेल्या बैठकीत उदय सामंत यांनी मी सगळ्या संघटनांना तुम्ही संप करू नका याचा त्रास नागरिकांना होऊ शकतो, अशी विनंती केल्याची माहिती दिली. टॅक्सी चालक संघटना आणि रिक्षाचालक संघटनांशी चर्चा झाल्यानंतर त्यांनी विनंती मान्य करत १५ सप्टेंबरचा संप मागं घेतल्याचं उदय सामंत यांनी सांगितलं. टॅक्सी चालकांच्या मागण्यांवर चार दिवसांनी पुन्हा एकदा बैठक आयोजित केली जाईल, अशी माहिती उदय सामंत यांनी दिली. टॅक्सी आणि रिक्षा दरवाढीसंदर्भात १० दिवसांचा वेळ मागितल्याचं सामंत यांनी सांगितलं. तर, टॅक्सी चालक संघटनांकडून देखील राज्य सरकारला १० दिवसांचा वेळ देत १५ सप्टेंबरचा बेमुदत संप लांबणीवर टाकण्यात आला आहे.

मुंबईतील टॅक्सी चालक आणि रिक्षा चालक संघटनानी १५ सप्टेंबरपासून बेमुदत संप पुकारला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार मंत्री उदय सामंत यांनी टॅक्सी संघटना आणि रिक्षाचालक संघटनांशी चर्चा केली. सगळ्या संघटनांना तुम्ही संप करू नका याचा त्रास नागरिकांना होऊ शकतो आणि याची जबाबदारी राज्य शासनावर येते, असं सांगितल्याची माहिती उदय सामंत यांनी दिली. संघटनांशी झालेल्या चर्चेनंतर त्यांनी संपाचा निर्णय मागे घेतल्याचं सांगितलं आहे.

## लोकशाही बळकटीकरणासाठी सर्व पात्र नागरिकांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घ्यावा : प्रांताधिकारी राहुल मुंडके

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोकशाही बळकटीकरणासाठी सर्व पात्र नागरिकांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घ्यावा तसेच मतदार यादी अधीक सक्षम बनविण्यासाठी आपल्या मतदान ओळख पत्रासोबत आधार क्रमांकाची जोडणी करावी, असे आवाहन प्रांताधिकारी राहुल मुंडके आणि तहसीलदार विजय तळेकर यांनी केले.

भारत निवडणूक आयोग व महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी देशपांडे तसेच रायगड जिल्हाधिकारी कल्याणकर यांच्या मार्फत हे अभियान राबविण्यात येत असून सर्वांनी आपले आधारकार्ड मतदार यादीशी लिंक करून घ्यावेत मतदार केंद्रीय स्थित अधिकार्यांमार्फत घरोघरी जाऊन हा



उपक्रम राबविला जात आहे यासाठी सदर व्यक्तींना शासनामार्फत ओळख पात्र सुद्धा देण्यात आले आहे तरी या उपक्रमाला सर्वांनी सहकार्य करावे, शहरी भागात नागरिकांकडून प्रतिसाद कमी प्रमाणात मिळत आहे काही खाणी शंभर टक्के काम झाल आहे तर काही ठिकाणी साठ ते सत्तर टक्के झालं आहे.

पनवेलची लोकसंख्या जवळपास पाच लाख सव्वीस हजार इतकी आहे त्यापैकी अठ्ठावीस हजार पेक्षा जास्त लोकांनी लिंक करून घेतले आहे गरुडा अँप द्वारे सुद्धा लिंक करू शकता त्याचप्रमाणे वेबसाईट वर जाऊन सुद्धा लिंक करू शकता तरी जास्तीत जास्त लोकांनी याचा फायदा घ्यावा असे आवाहन प्रांताधिकारी राहुल मुंडके व तहसीलदार विजय तळेकर यांनी केले आहे.

## रिक्षा चोरी करणाऱ्या टोळीचा माणगाव पोलीसांकडून पर्दाफाश ; १२ रिक्षांसह ३ आरोपींना अटक

**दै.रायगड नगरी । माणगाव**

ऑटो रिक्षा चोरी करून फसवणूक करणाऱ्या टोळीचा माणगांव पोलिसांनी पर्दाफाश केला असून एकूण १२ रिक्षांसह ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तरपणे असे की, माणगाव येथील प्रविण प्रदिप मोने, वय-३६ वर्षे, व्यवसाय- किराणा मालाचे दुकान रा.उतेखोलवाडी यांनी माणगाव येथील आरोपी अमित सुरेश बुटे, वय-३६ रा. हनुमान मंदीराच्या पाठीमागे, उतेखोलवाडी याचेकडुन जुनी रिक्षा घेतली होती. या रिक्षाबाबत प्रविण मोने यांनी अमित बुटे यांस रिक्षाचा नंबर व कागदपत्राबाबत विचारणा केली. परंतु त्याने रिक्षाची कागदपत्रे दिली नाही. तसेच संपर्क करण्यास टाळाटाळ करू लागला. म्हणुन प्रविण प्रदिप मोने यांनी माणगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं २५७/२०२२ भा. द. वि कलम ४०६, ४२० अन्वये गुन्हा दाखल केला.



या गुन्हयाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविण पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सुरू केल्यानंतर आरोपी अमित सुरेश बुटे यास अटक केली. त्याचे साथीदार योगेश फाटु कोरगावकर उर्फ लारा वय - ३९, वर्षे रा. घर नं १६४, रमाकांत म्हात्रे उपमहापौर यांचे बंगल्याजवळ, गोठवली, रबाळे नवी मुंबई व केतन राजु जाधव वय २३ वर्षे रा. साठेनगर, नौसील नाका, रबाळे पोलीस स्टेशन शेजारी, रबाळे, नवी मुंबई मुळ रा. रूम नं ५९०,

...//२

## रेल्वे फलाटावर सापडले 3 वर्षांचे बाळ

### शोध मोहीम राबवून रेल्वे पोलिसांनी केले पालकांच्या स्वाधीन



**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा रेल्वे पोलीस चौकीवरील अधिकारी व कर्मचारी हे रेल्वेचे सर्व अभियान कर्तव्यदक्ष पणे राबवत असल्याचे अनेकदा समोर आले आहे. यातीलच ऑपरेशन 'नन्हे फरिश्ते' अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी नुकतीच रोहा रेल्वे पोलीसांनी नुकतीच केली. यामध्ये रोहा रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक १ वर नजीकच्या अष्टमी मोहल्यातुन घराचा रस्ता विसरून आलेल्या बालकास त्याच्या पालकांकडे सुखरूपपणे सुपूर्द केले. यावेळी आपला हरवलेला मुलगा काही तासांत सापडल्याचे आनंद त्या मातापित्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वहात होता.

यासंबंधी रेल्वे पोलिसांकडून मिळालेल्या माहिती नुसार रोहा रेल्वे पोलिसांचे मुख्य आरक्षक बी. के. दिवशे व बी. एस. वर्मा हे फलाट क्रमांक १ वर कर्तव्यावर तैनात असताना दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास एक लहान मुलगा रडत असल्याचे त्यांचे निदर्शनास आले. त्यांनी याची माहिती तात्काळ उपनिरिक्षक राकेश पाटीदार यांना दिली. उपनिरिक्षक पाटीदार हे तत्परतेने फलाट क्रमांक १ वर जात त्या मुलाची चोकशी करु लागले. मात्र ते लहान मुल आपले नाव व पत्ता सांगु शकत नव्हते. त्याच वेळी फलाटाव थांबलेल्या गाडी न. ०१३४८ मध्ये त्या मुलाचे पालक सापडतात का यासाठी ध्वनिक्षेपका द्वारे घोषणा केली. मात्र कोणीही पालक समोर आले नाहीत. अखेर त्या लहान मुलाला रेल्वे पोलीस चौकीत आणण्यात आले.

त्यानंतर आजुबाजुच्या परिसरात त्या लहान बालकाच्या पालकांबाबत रेल्वे पोलिसांनी तपासास सुरुवात केली. त्याच वेळी पावणे पाचच्या दरम्यान अष्टमी येथे राहणारे मोहम्मद वाजीद व त्यांची पत्नी हे रेल्वे स्थानक परिसरात आले. ते आपल्या हरवलेल्या लहान मुलाचा शोध घेत असल्याचे त्यांनी रेल्वे पोलिसांना सांगितले. त्यावेळी चौकीत असणारा बालक रेल्वे पोलिसांनी त्यांना दाखविला. त्याला पाहताचा आईबापांनीं आपल्या मुलाला ओळखले व तो लहान मुलगाही धावत त्यांना जाऊन बिलगला.अरहान वय ३ वर्षे हा आपला मुलगा असून आज दुपारी घराबाहेर खेळता खेळता गायब झाला व तेव्हां पासून आम्ही त्याचा शोध घेत असल्याचे पालकांनी सांगितले. त्यानंतर निरीक्षक राजेंद्र जगताप यांना यासंबंधी सर्व माहिती देत सर्व सर्व कागदोपत्री कारवाई करत त्या

...//२

# लोकहितं मम करणीयम ?

भारतीय राज्यघटनेतील तरतुदींनुसार न्यायव्यवस्था काम करीत असली तरी या यंत्रणेपर्यंत पोहोचण्याचा विचारही मनात येऊ न शकणारे कोट्यवधी नागरिक आजही आहेत. या मूकनायकांना आवाज देण्याच्या उद्देशाने न्या. पी. एन. भगवती यांनी 'जनहित याचिका' या न्यायालयीन शस्त्राला जन्म दिला. न्या. व्ही. आर. कृष्णा अय्यर यांनीही हे आयुध उचलून धरले. आता ते चांगलेच स्थिरावले आहे. 'आपला व्यक्तिगत स्वार्थ नसताना व्यापक जनहितासाठी न्यायालयात विशेष याचिकेने धाव' हे जनहित याचिकेचे मूळ आदर्श स्वरूप आहे. कोणताही कायदा, नियम, सुविधा किंवा सरकारी निर्णय आला की त्याचे 'खाली डोके वर पाय' असे करून दाखविणारी अफाट बुद्धिसंपदा आणि श्रमकौशल्य भारतीयांकडे आहे. भारतात दरवर्षी निदान २५ हजार नव्या जनहित याचिका दाखल होतात. ऐंशीच्या दशकात 'न्यायालयीन सक्रियता' या मूल्याला बळ आले. ते समाजसन्मुख न्यायप्रणालीचे स्वप्न पाहणारे होते. त्यामुळे, न्या. भगवती यांनी दिलेले हे हत्यार इतके लोकप्रिय झाले की, १९८५ ते २०१९ या काळात नऊ लाख २४ हजार जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात आल्या. एकदा असे शस्त्र नागरिकांना दिल्यानंतर ते कोण वापरते आणि ते वापरणाऱ्यांच्या हेतूंची शुद्धता कशी तपासायची, हा एक नवाच न्यायिक आणि नैतिक पेच निर्माण होतो. या पेचातून सुटण्यासाठी नवे सरन्यायाधीश उदय लळीत यांनी ज्या धडाक्याने पावले टाकली आहेत, त्याचे स्वागत करायला हवे. आजवर तुंबलेल्या जनहित याचिका बाहेर काढून, त्यांचे वर्गीकरण करून, एका विषयाचे याचिकागुच्छ तयार करून आणि विविध खंडपीठांना या याचिका निकालांसाठी वाटून देऊन न्या. लळीत यांनी न्यायालयीन सक्रियतेला एक नवा आयाम दिला आहे. न्या. लळीत यांची कारकीर्द अल्प म्हणजे ७४ दिवसांची आहे. मात्र, त्यांनी सुरू केलेले हे काम जर पुढे असेच वेगाने चालू राहिले तर तुंबलेल्या हजारो प्रकरणांचा वेगाने निपटारा होऊ शकेल. न्या. लळीत यांनी सोमवारीच आपल्या खंडपीठापुढे दोनशेहून अधिक याचिकांची सुनावणी नेमस्त केली होती. विशेष म्हणजे, या याचिकांमध्ये तब्बल १८९ जनहित याचिका या नव्या नागरिकत्व कायद्याच्या संदर्भात आहेत. या प्रत्येक याचिकेची स्वतंत्र सुनावणी घ्यायची झाली तर न्यायालयाला दुसरे कामच दीर्घकाळ करता येणार नाही. मात्र, कोणत्या विषयाच्या कशा जनहित याचिका करायच्या, त्यांच्यात कसे अंतर राखायचे, त्यांत वेगवेगळे घटनात्मक मुद्दे कसे उपस्थित करायचे आणि त्या निमित्ताने एखादा विषय सातत्याने कसा चर्चेत व माध्यमांसमोर ठेवायचा, याचे जनहित याचिकाशास्त्रच राजधानीत विकसित झाले आहे. त्यासाठी, अनेक कायदेपंडित दिवस-रात्र एक करतात. आता तर सर्वोच्च न्यायालयात येणाऱ्या जनाहित याचिकांचा ओघ इतका वाढला आहे की, खंडपीठांना एकेका याचिकेचा विचार करण्यासाठी सरासरी पाच मिनिटे मिळणेही कठीण व्हावे. या याचिका कशा येतात; याचे एक उदाहरण पाहण्यासारखे आहे. पुरीच्या जगविख्यात जगन्नाथ मंदिराच्या आवारात भक्तांसाठी स्वच्छतागृहे, जलपान व इतर सोयी करण्याचे सरकारने योजिले होते. या कामाला १९५८च्या 'प्राचीन वास्तू संरक्षण कायद्या'चा आधार घेऊन आव्हान देण्यात आले. या याचिकेची सुनावणी करताना न्या. भूषण गवई यांच्या खंडपीठाने स्वाभाविकच संताप व्यक्त केला. ही याचिका तर फेटाळलीच; पण याचकांना एक लाखाचा दंड ठोठावला. न्यायालयाने काही महिन्यांपूर्वी ही याचिका फेटाळताना 'मूळ वास्तुकलेला धक्का न लावता काम करण्याचे उडिशा सरकारने आधीच मान्य केल्याचे' दाखवून दिले. तसेच, अशा याचिकांबाबत स्पष्ट नाराजी व्यक्त केली. इतके होऊनही, आजही अशा याचिकांचा ओघ थांबलेला नाहीच. सगळ्याच जनहित याचिका अशा असतात, असे नाही. राजस्थानात अर्भकविवाहाला विरोध केल्याबद्दल भंवरीदेवी या महिलेचा कामाच्या ठिकाणी अतोनात छळ झाला. तिच्यावर बलात्कार करण्यात आला. मात्र, भंवरीदेवी यांनी हार न मानता जनहित याचिका केली. त्यातून कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाचा मुद्दा पुढे आला. कठोर नियम झाले. आजची 'विशाखा नियमावली' त्यातून बनली. अशाच दुसऱ्या जनहित याचिकेमुळे 'कोणत्याही अपघातातील जखमी व्यक्तीवर जवळच्या डॉक्टर तसेच रुग्णालयांनी उपचार करणे' सर्वोच्च न्यायालयाने बंधनकारक केले आहे. हजारो माणसे अपघातात मरण पावणाऱ्या देशात हा निकाल म्हणजे मैलाचा दगड होता. मात्र, न्याय मिळविण्याचा शुद्ध हेतू, समाजहिताची प्रामाणिक कळकळ आणि जनहित याचिकेचे हत्यार राजकीय उद्दिष्टांसाठी न वापरण्याचा विवेक हे असल्याशिवाय न्या. भगवती किंवा न्या. अय्यर यांचे स्वप्न पुरे कसे होणार? जनहित याचिकेची संकल्पना 'लोकहितं मम करणीयम्' अशी असली तरी, तसे सोंग घेऊन न्यायप्रक्रिया भलतीकडे नेणाऱ्यांचा बंदोबस्तही आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने ते करावे.

# खालापूर तालुक्यात ड्रोनद्वारे झालेल्या गावठाण भूमापन सर्व्हे अन्वये सनद वाटप कार्यक्रमास जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, कोकण प्रदेश, मुंबई भूमी अभिलेखचे उपसंचालक जयंत निकम आणि रायगड जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सचिन इंगळी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली खालापूर तालुक्यात ड्रोनद्वारे झालेल्या गावठाण भूमापन सर्व्हे अन्वये सनद वाटप कार्यक्रमास तालुक्यातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

संपूर्ण महाराष्ट्रातील ज्या गावांचे गावठाण भूमापन झालेले नाही, अशा गावांचे संपूर्ण गावठाण सर्वेक्षण करण्याचा महत्वपूर्ण निर्णय केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी अशा स्वामित्व योजनेंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास खात्यांतर्गत घेण्यात आला. त्यानुसार भूमी अभिलेख विभागाच्या पुढाकाराने महसूल विभाग व ग्रामविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामित्व योजना सुरु करण्यात आली.

स्वामित्व योजनेंतर्गत खालापूर तालुक्यातील कामकाज सुरु असून या तालुक्यातील एकूण १५३ गावे व वाड्यांपैकी गावठाण भूमापन न झालेले १०३ गावांची अत्याधुनिक ड्रोनद्वारे भारतीय सर्वेक्षण विभाग यांच्यामार्फत अत्यंत अचूक पद्धतीने मोजणी करण्यात आली.

मोजणी नकाशे भारतीय सर्वेक्षण विभागाकडून मिळाल्यानंतर प्रत्यक्षात जागेवर जावून भूमी अभिलेख विभागाच्या अधिकारी चौकशी करून संपूर्ण अभिलेख डिजिटाईज करून घेतात, सर्व्हे ऑफ इंडिया मार्फत भौगोलिक माहिती प्रणालीद्वारे गावठाणातील प्रत्येक मिळकतीची सनद मिळकत पत्रिका व नकाशा तयार केले जातात.

अशा पद्धतीने खालापूर येथे १०३ गावांचे ड्रोन सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून ४५ गावांचे प्रत्यक्ष जागेवर जावून चौकशीचे काम देखील पूर्ण झालेले आहे. त्यापैकी ३८ गावांच्या मिळकत पत्रिका तयार असून १३ गावांच्या सनद तयार झालेल्या आहेत. सनद हा शासनाने मालकी हक्काचा पुरावा म्हणून घोषित केलेला आहे.

या सनद वाटप कार्यक्रमासाठी विशेष शिबिर घेण्यात आले असून दि.०७ सप्टेंबर २०२२ रोजी मौजे विणेगाव, मौजे इसांबे, मौजे तोंडली, मौजे ढेकू, मौजे वारद, मौजे कुंभिवली व दि.०८ सप्टेंबर २०२२ रोजी मौजे सारसन, मौजे लोहोप, मौजे स्वाली, मौजे पौद, मौजे केळवली या गावांच्या सनद वितरण करण्याचा कार्यक्रम संबंधीत ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यात आला.

यावेळी संबंधित गावाचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामसेवक यांनी उत्तम सहकार्य केले. याप्रसंगी सरासरी ८२% वसूली झाली आहे. संबंधित मिळकतधारकांकडून सनद घेण्यासाठी चांगला प्रतिसाद मिळाला.

उपअधीक्षक, भूमी अभिलेख, खालापूर या कार्यालयाने शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत संबंधित खातेदारांना सनद वाटप व मिळकत पत्रिका चावडी वाचन केले व या सनदेमध्ये काही अडचणी किंवा चुका असतील तर त्यांचे अर्ज तात्काळ प्राप्त करून घेतले. प्रत्येकाला आपल्या मालकी हक्काचा पुरावा व अभिलेख मिळाल्यामुळे जनतेने समाधान व्यक्त केले आहे.

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, कोकण प्रदेश, मुंबई भूमी अभिलेखचे उपसंचालक जयंत निकम आणि रायगड जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सचिन इंगळी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली खालापूर भूमी अभिलेख उपअधीक्षक शरद काळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अचूक नियोजन करून ही मोहीम यशस्वी केली.

# एमएमआरडीएचे काम जैसे थे ? अद्यापही रस्त्याची डागडुजी नाही

## स्थानिकांमध्ये संतापाचे वातावरण

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये नुकताच मोठया प्रमाणावर झालेल्या अतिवृष्टीमुळे पहिल्याच पावसात एमएमआरडीए च्या माध्यमातून दस्तुरी(अमन लॉज ) रेल्वे स्टेशन पासून ते हॉटेल वे साईड ईन पर्यंत बनविण्यात आलेल्या क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्याची अत्यंत दुर्दशा झालेली पहावयास मिळत आहे.या रस्त्याला काही ठिकाणी मोठं मोठाले चर पडल्याने त्यावरून पर्यटकांना चालणे,आपले सामान ओढून नेणे,हातरीक्षा चालकांना तसेच घोडेवाल्यांना आपले घोडे नेणे खूपच जिकिरीचे बनले आहे.रस्त्यांची खूपच दुर्दशा झालेली आहे बहुतेक ठिकाणी ब्लॉक रस्ता खचला आहे त्याची अद्यापही डागडुजी संबंधीत ठेकेदाराने केलेली नसताना

याबाबत एमएमआरडीए चे कार्यकारी अभियंता यांनी काही माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार आम्ही ब्लॉक पुन्हा बसविले आहेत असे म्हंटले आहे परंतु आज रोजी त्या जागेची समक्ष पाहणी केली असता रस्ता आहे त्याच स्थितीत असून एमएमआरडीए चे काम जैसे थे अशाच प्रकारे असल्याने एमएमआरडीए चे अधिकारी सुध्दा कामात चालढकल करताना स्पष्टपणे दिसून येत असल्याने स्थानिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. अमन लॉज रेल्वे स्टेशन जवळील काळोखी या अती चढावाच्या ठिकाणी हॉटेल वे साईड ईन पर्यंत जवळपास पाचशे मीटर रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे.ही कामे पूर्ण करताना संबंधीत ठेकेदार कशाप्रकारे कामे पूर्ण करत आहे त्याकडे एमएमआरडीए च्या अधिकारी वर्गाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्यामुळे रस्त्याची भयानक अवस्था झालेली आहे. ठेकेदाराने इथल्या पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी कुठल्याही प्रकारचे नियोजन केले नसल्याने सर्व पाणी रस्त्यावरून वाहत आहे.

याबाबत जून महिन्यात एमएमआरडीए च्या अधिकाऱ्यांना सांगीतल्यावरून त्यांनी पावसाळी पाणी वाहून जाण्यासाठी ठराविक ठिकाणी रस्त्याच्या कडेला छिद्र केलेले आहेत. ब्लॉक



बसविताना कामात पारदर्शकता दिसून येत नाही त्यामुळे ब्लॉक खाली अंथरलेली ग्रीट पूर्णपणे वाहून गेलेली दिसत आहे.अनावश्यक ठिकाणी ग्याबियन वॉल साठी अर्थातच काम दाखविण्यासाठी घाई केल्यामुळे रस्ते ज्या पद्धतीने होणे अपेक्षित होते ते काम न केल्यामुळे याचा नाहक त्रास पर्यटकांना तसेच स्थानिकांना सोसावा लागत आहे.

माथेरान सारख्या या दुर्गम भागात विकास कामे पूर्ण करण्यासाठी जवळपास १२३ कोटी रुपयांचा निधी नेहमी नेहमी उपलब्ध होणारा नाही त्यामुळे जी काही विकास कामे पूर्ण होणे गरजेचे आहे ती त्या पद्धतीने केली जात नाहीत.

एमएमआरडीए सारखी एका नावाजलेल्या संस्थेकडुन अशाप्रकारे कामे होत असल्याने तर्कवितर्क लढविले जात आहेत. आणि विशेष म्हणजे होत असलेल्या या सर्व महत्वाकांक्षी कामांकडे संबंधीत ठेकेदाराच्या अनागोंदी कारभाराकडे सर्वच अधिकारी वर्ग कानाडोळा का करत आहेत हा सुद्धा संशोधनाचा विषय असल्याचे बोलले जात आहे.सदर बाबतीत एमएमआरडीए चे कार्यकारी अभियंता अरविंद धाबे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता होऊ शकला नाही.संबंधीत ठेकेदाराने पाच वर्षे या रस्त्याच्या डागडुजी कडे लक्ष केंद्रित करण्याचे आहे त्यामुळे त्यांची संपूर्ण बिले अदा करू नयेत असे सुध्दा स्थानिकांमधून बोलले जात आहे

# महात्मा गांधी तंटामुक्ती समिती खोपटेच्या अध्यक्षपदी प्रमोद ठाकूर

**दै.रायगड नगरी । उरण**

ग्रुप ग्रामपंचायत बांधपाडा यांच्या विद्यमाने घेण्यात आलेल्या ग्रामसभेमध्ये महात्मा गांधी तंटामुक्त कमिटी (खोपटे) च्या अध्यक्ष पदी विघ्नहर्ता सामाजिक संस्था चे संस्थापक प्रमोद पांडुरंग ठाकूर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



यावेळी प्रमोद ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. खोपटे गावातील माझ्याकडे येणारे वाद असतील तंटे असतील ते सामोपचाराने सोडवण्याचा पुरेपूर प्रामाणिक प्रयत्न करेन. व या पदाचा सन्मान वाढवण्याचा प्रयत्न करेन.यावेळी ग्रामपंचायतच्या सरपंच विशाखा ताई ठाकूर, उपसरपंच सुजित म्हात्रे, ग्रामसेवक रुपम गावंड, सर्व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य, सात पाड्याचे अध्यक्ष, ग्रामसुधारण मंडळ खोपटेचे सचिव कुमार ठाकूर तसेच उपस्थित ग्रामस्थाचे आभार म्हणून धन्यवाद व्यक्त केले. ग्रामसेवक रुपम गावंड व सरपंच विशाखा ठाकूर यांनी प्रमोद ठाकूर यांचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.ग्रामस्थ, हितचिंतक, मित्र परिवार नातेवाईक यांनीही प्रमोद ठाकूर यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते यांच्या मागणीला यश

वाचवण्याचे काम आरोग्य सेवकांनी केले आहे. पनवेल महापालिकेचे आताचे ११ आणि नव्याने मंजूर झालेले ९ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. महापालिका क्षेत्राची लोकसंख्या पाहता भविष्यात आणखीन काही आरोग्य केंद्र आणि मिनी हॉस्पिटल उभारावे लागतील. कोविड काळात डॉक्टर, नर्स, फार्मासिस्ट, लॅब टेक्नीशियन अशा विविध पदावर नेमलेल्या आरोग्य सेवकांना कामावरून कमी करण्यात आले आहे. त्यामुळे आरोग्य सेवा कुमकुवत झाल्याचे जाणवत आहे. कोरोना रोगाचे संकट हे अचानक आले होते. तेव्हा आरोग्य सेवा ही कमकुवत होती त्यामुळे सुरुवातीच्या काळात अनेक नागरिकांना प्राण गमवावे लागले. ज्यावेळी आरोग्य सेवकांची नेमणूक करून आपली आरोग्य सेवा बळकट केली तेव्हा लाखो नागरिकांचे प्राण वाचविण्यात पनवेल महानगरपालिकेला यश आले.

कोरोना सारखे प्राणघातक रोग कधीही उद्भवू शकतात. त्यामुळे आपली आरोग्य सेवा कायम बळकट असणे गरजेचे आहे. पालिकेच्या अर्थव्यवस्थेत कायमस्वरूपी तरतूद ठेऊन पनवेल महानगरपालिकेची आरोग्य सेवा बळकट ठेवण्यासाठी आरोग्य सेवकांना पालिकेत कायम स्वरूपी ठेवण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात यावा.अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यानी केली होती. माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्या मागणीला यश आले आहे.

## जूनपर्यंत प्रकल्प महाराष्ट्रात होता, मग सरकार बदलताच गुजरातला कसा गेला

आदित्य ठाकरे यांनी म्हटले की, राज्यातील सध्याच्या व्यवस्थेवर कोणाचा विश्वास उरलेला नाही. रोज बदल्या होत आहेत. कोण कुठे जातंय ते कळत नाही, त्यामुळे काहीच कळेनासे झाले आहे. मुख्यमंत्री सगळीकडे गरागरा फिरत आहेत. पण आता त्यांनी मंत्रालयात बसून काम करण्याची गरज आहे, असा टोला आदित्य ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांना लगावला. 'फॉक्सकॉन' प्रकल्प राज्याबाहेर गेला असला तरी आता एअरबसचा एक प्रकल्प आणि क्युबिक कंपनीचा प्रकल्प हे महाराष्ट्रात येण्याच्या मार्गावर आहेत. आता किमान हे प्रकल्प तरी महाराष्ट्राबाहेर जाऊ नयेत, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले.

या पत्रकारपरिषदेत माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनीही मागील सरकारच्या काळात झालेल्या सर्व वाटाघाटींची माहिती दिली. गेल्या वर्षभरात हा प्रकल्प महाराष्ट्रात आणण्यासंदर्भात चालना मिळाली. दाव्होस परिषदेत मी आणि आदित्य ठाकरे यांनी वेदांतचे प्रमुख अनिल अग्रवाल यांच्याशी प्रदीर्घ चर्चा केली होती. अनेक मुद्द्यांवर चर्चा केल्यानंतर त्यांनी सांगितलं की, माझं समाधान झाले आहे. आम्हाला भारतात उद्योग आणायचा असेल तर महाराष्ट्रातच हा प्रकल्प स्थापन करु, असे त्यांनी म्हटले होते. इतकी सकारात्मक चर्चा झाली होती. तीन महिन्यांपूर्वी दिल्लीत 'फॉक्सकॉन'चे अध्यक्ष तैवानवरुन आले होते. त्यावेळी आम्ही त्यांच्याशी चर्चा केली होती. त्यांना कोणत्या सवलती, कोणत्या सुविधा द्यायच्या यावर चर्चा झाल्यानंतर त्यांनी तळेगाव हे ठिकाण अंतिम केले होते. केवळ कागदोपत्री व्यवहार बाकी होती. मध्यंतरी आमचं सरकार गेल्याने पुढील प्रयत्न थांबले. हा उद्योग महाराष्ट्राच्यादृष्टीने खूपच फायद्याचा होता. यामुळे इतर अनेक उद्योगांना फायदा झाला असता. परंतु, केंद्रातील सरकार 'समर्थ' असल्याने आणखी किती उद्योग अशाप्रकारे महाराष्ट्राबाहेर जाणार, असा खोचक सवाल सुभाष देसाई यांनी उपस्थित केला.

## रिक्षा चोरी करणाऱ्या टोळीचा माणगाव पोलीसांकडून पर्दाफाश

जाधव चाळ, साईनाथ वाडी, सेक्टर १, ऐरोली, नवी मुंबई तसेच अतिष दिलीप पाटील वय २६ व्यवसाय-कामगार, रा.फ्लॅट नं २०४, हरिनारायण अपार्टमेंट, गवळी हॉस्पीटल जवळ, रबाळे गाव, नवी मुंबई यांचे मदतीने केल्याचे सांगितले.

तपासामध्ये योगेश फाटु कोरगावकर उर्फ लारा, केतन राजु जाधव, अतिष दिलीप पाटील हे रिक्षा चोरी करून त्या रिक्षा अमित सुरेश बुटे याला देत. व तो माणगाव येथील लोकांना कागदपत्र व नंबर नंतर देतो असे सांगुन फसवणुक करत. या गुन्हयामध्ये आतापर्यंत अमित सुरेश बुटे, केतन राजु जाधव, अतिष दिलीप पाटील यांना अटक केली असुन आतापर्यंत एकण १२ ऑटो रिक्षा एकुण किंमत ०४,३४,००० रु (मुळ किंमत १२,००,००० रू) एवढया किंमतीच्या रिक्षा जप्त केल्या आहेत. रिक्षा चोरी झाल्याबाबत रबाळे नवी मुंबई येथे गुन्हे दाखल आहेत. गुन्ह्याचा तपास पोलीस अधिक्षक अशोक दुधे, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविण पाटील, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माणगांव पोलिसांनी केला.

## रेल्वे फलाटावर सापडले ३ वर्षांचे बाळ


मुलाला त्याच्या पालकांकडे सुपूर्द केला. रोहा रेल्वे पोलिसांचे पालकांनी आभार मानले असून या माणुसकी जपणाऱ्या कामगिरी बद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ५०० हुन अधिक जणांचे जीव वाचवणारे देवदूतांचे नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी केले कौतुक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वडघर कोळीवाडा येथील गणेश विसर्जनादरम्यान प्रसंगावधान राखत राज्य राखीव पोलीस दलाचे जावं तसेच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे दलाचे अधिकारी यांनी वेळीच जनरेटरमधून सूरु असलेल्या विजप्रवाह वाहिनी बाजूला केल्याने विसर्जनासाठी आलेले सुमारे पाचशे भाविक विजझटक्यापासून वाचू शकले. त्यांच्या या कामगिरीचे नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी कौतूक केले आहे.

पनवेलमधील कोळीवाड्याशेजारी घरगुती गणेशमुर्तींचे विसर्जनासाठी पालिकेने जनरेटरच्या विजेवर या परिसरात रात्री अंधार होऊ नये म्हणून जनरेटर लावले होते. विसर्जनावेळी मुसळधार पावसामुळे जनरेटरची वायर तुटली आणि विसर्जनासाठी आलेल्या मानस कुंभार या तरुणाच्या अंगावर पडली. हे पाहून त्याचे कुटुंबीय वाचवण्यासाठी आले





असता त्यांनाही विजेचा शॉक बसला. लागलीच गणेशभक्तांची धावपळ सूरु झाली. सर्वत्र खळबळ माजली असताना या विसर्जन स्थळी शांतता राखण्यासाठी कर्तव्यावर असणारे पनवेल शहर पोलीस ठाण्याचे निरिक्षक संजय जोशी, सहाय्यक पोलीस निरिक्षक शिवाजी हुलगे यांच्यासह एस.आर.पी. एफ.च्या गोरेगाव ब तुकडीचे उत्तम बबन चातशे, प्रशांत भाऊसाहेब साबळे, सागर जाधव यांनी घटनेतील गांर्भीय ओळखून सर्वप्रथम विजेचा झटक्यामुळे हा सर्व गोंधळ उडाल्याची खात्री काही क्षणात केली. तसेच जनरेटरमधून सूरु असलेल्या विजप्रवाह वाहिनी बाजूला केला त्यामुळे या ठिकाणी बाप्पाला निरोप देण्यासाठी उभी असलेली सुमारे पाचशे जण विजझटक्यापासून वाचू शकले. त्यांच्या या कामगिरीचे नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी कौतूक केले आहे. तसेच पनवेलमधील विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी व नागरिकांनी सुद्धा पोलीसांचे कौतूक केले आहे.

# खारघर, तळोजा परिसरामध्ये पनवेल महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकाची फेरीवाल्यांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर आणि तळोजामधील रस्त्यांवर ठाण मांडलेल्या अनधिकृत फेरीवाले आणि रस्त्याच्या कडेला उभारलेल्या होर्डिंगवर पालिकेने कारवाई केली. तळोजा वसाहतीच्या प्रवेशद्वार असलेल्या रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात अनधिकृत होर्डिंग उभारण्यात आले होते. याला लागूनच नवी मुंबई मेट्रो जात असल्यामुळे सदर रस्त्याला विद्रुपचे स्वरूप आले होते. तसेच काहींनी अनधिकृत शेड उभारून व्यवसाय थाटला होता. खारघर सेक्टर ३४ कडून तळोजाकडे तसेच सत्यसाई संजीवनी रुग्णालय आणि अमनदूत मेट्रो स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला गणेशोत्सवामध्ये पक्के शेड उभारले होते. त्याचबरोबर शीघ्र कृती ४ दल समोरील सिग्नललगत मटण विक्रेत्यांनी शेड उभारले होते.

दरम्यान, मेट्रो पुलालगत मोठ्या प्रमाणात लावण्यात आलेल्या होर्डिंग्जमुळे सिडको अधिकाऱ्यांनीही नाराजी व्यक्त केली होती. खारघर आणि तळोजामध्ये रस्ते अडवून व्यवसाय सुरू करणाऱ्यांवर पालिकेचे प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांच्या उपस्थितीत जेसीबीच्या साह्याने अनधिकृत होर्डिंग व फेरीवाल्यांची दुकाने जमीनदोस्त करण्यात आल्याने नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

# उरण येथे गौरा गणेशोत्सव साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

अनंतचतुर्दशीला गणेशोत्सवाची सांगता झाली उरण तालुका सह शहरातील तिक ठिकाणी गणेश बक्तांनी मंगळवारी (दि. १३) साखरचौथीच्या म्हणजेच गौरा गणपतींचे आगमन झाले असून . साधारणपणे दीड दिवसाच्या मुक्कामानंतर या बाप्पाला निरोप दिला जातो.

अनंत चतुर्दशीनंतर येणाऱ्या पहिल्या संकष्ट चतुर्थीच्या दिवशी या गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. याला गौरा गणपती असेही म्हटले जाते गणेश चतुर्थीला आलेल्या २१ दिवसांच्या गणपतींचा काही ठिकाणी अजनूही मुक्काम आहे. असे असतानाच मंगळवारी गौरा गणपतींचे आगमन झाले आहे. पितृपक्षात साजरा होणारा हा एकमेव उत्सव आहे. घरगुती आणि सार्वजनिक अशा दोन्ही स्वरूपांत हा उत्सव साजरा करतांना दिसत होते. भाजपा उरण तालुका उपाध्यक्ष पंडीतशेठ घरत यांनी उरण शहरातील गणपती चौक येथील महा गणपती मंदिरात सह पत्नीक गणपती चे दर्शन घेतले व पुढे सर्व मित्र मंडळी, नातेवाईक यांच्या कडे जाऊनगौरा गणपतीचे दर्शन घेतले. उरण तालुक्यात गौरा गणपती उत्सव साजरा करण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. ३१ ऑगस्ट रोजी गणेशोत्सव सुरू झाला. ८ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीला १० दिवसांच्या गणपतीला निरोप देण्यात आला. गणेश चतुर्थीला आलेल्या २१ दिवसांच्या गणपतींचा अजनूही काही ठिकाणी मुक्काम आहे. असे असतानाच मंगळवारी रोजी गौरा गणपतींचे आगमन झाले आहे. उरण शहरातील महा गणपती गणेश मंदिरात सकाळ पासून खूपच गर्दी होती. मंदिरा समोर दुर्वा हार, नारळ, फुले फुलांचे हार अशी फुलंची दुकाने थाटण्यात ळी होती

सर्व प्रकारच्या जाहिरातींचे उत्तम माध्यम
दैनिक रायगड नगरी
9619979706 / 9619737911

**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# अंगारकी संकष्टीला अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत भाविकांची गर्दी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**



अंगारकी संकष्टी चतुर्थीला अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत भाविकांची गर्दी पहावयास मिळाली. गणेशोत्सव असल्याने सर्वत्र भक्तिमय व मंगलमय वातावरण आहे. महाराष्ट्रातील अष्टविनायक तीर्थ क्षेत्रापैकी प्रख्यात धार्मिक स्थळ असलेले पालीतील बल्लाळेश्वर मंदिर मंगळवार दि.(१३) रोजी अंगारकी संकष्टी चतुर्थीला भाविक भक्तगणांनी फुलून निघाले. अंगारकी संकष्टीनिमित्त श्री बल्लाळेश्वराची मूर्ती फुलांनी सजवली होती, सर्वत्र फुलांची सजावट व विद्युत रोषणाई केली होती. दर्शनासाठी पालीत मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते. पाली शहर भाविकांनी न्हाऊन निघाले.

गणेशोत्सवाचे वातावरण असल्याने दर्शनासाठी रायगड जिल्हा, महाराष्ट्रातील विविध भागांसह मुबंई, ठाणे पुणे आदी शहरांतील भाविक व पर्यटक मोठ्या प्रमाणावर पालीत दाखल झाले होते. गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यवसायिकांचा धंदा देखिल तेजीत होता. बल्लाळेश्वर मंदिर परिसरात गावठी भाज्या, फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक महिला विक्रेत्या बसल्या होत्या. देवळात येणारे भाविक आवर्जून ते खरेदी करत होते. त्यामुळे या विक्रेत्यांचा धंदा चांगला झाला.

संकष्टी निमित्त मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. परिसरातील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार , फुल व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले जय्यत तयारीत होते. मंदिर परिसरात मोठी वर्दळ पहायला मिळत होती. जणूकाही यात्रेचे स्वरूप आले होते. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. बल्लाळेश्वराचे मनोभावे दर्शन केल्यानंतर भाविकांच्या चेहऱ्यावर एक आगळेवेगळे समाधान दिसून येत होते. कोव्हीडचे प्रमाण कमी झाल्याने बल्लाळेश्वर मंदिर व परिसर भाविकांनी फुलून निघतो आहे. बल्लाळेश्वर ट्रस्टने कोरोनाकाळात विशेष खबरदारी घेत उपाययोजना केल्या होत्या . बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाण्याची व सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात आली आहे. रांगेत उभे राहण्यासाठी रेलींग व शेड उभारण्यात आली आहे. वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानची दोन भव्य मोफत पार्किंग देखील आहे. तसेच सुसज्ज स्वच्छता गृह देखिल उभारण्यात आले आहेत. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही. असे देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष जितेंद्र गद्रे व विश्वस्त मंडळाने सांगितले. पालितील अरुंद रस्त्यामुळे अंगारकी संकष्टीला वाहनांची वर्दळ दिसुन आली.

पालीत दाखल झालेल्या भाविकांच्या गाड्यांमूळे वाहतुकिस अडसर निर्माण झाल्याचे दिसून आले. परंतू पाली पोलीस व बल्लाळेश्वर देवस्थानचे सुरक्षा रक्षक वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करत होते. दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने पाली पोलीस निरीक्षक विश्वजित काईनगडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक नाक्यावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. देवळाच्या शेजारून जाणारी सर्व वाहने भक्तनिवास क्रमांक १ च्या बाजूने पार्किंगच्या दिशेने वळविण्यात आली होती.


# साथीच्या आजाराने खारघरवासिय त्रस्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघरमध्ये कोरोनाचा प्रादूर्भाव नियंत्रणात आल्यानंतर आता साथीच्या आजारांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. शहरात स्वाईन फ्लू, मलेरिया आणि डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत असून नुकतेच साथीच्या आजाराचे ५०हून अधिक रुग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. खारघर वसाहतीत आजही अनेक भागांत कचर्याचे ढीग, मलनिस्सारण वाहिन्यांच्या विविध समस्या असल्याचा आरोप नागरिकांमधून केला जात आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांवर दुर्गंधीयुक्त पाणी वाहत असून पावसाळ्यापूर्वी वसाहतीमधील गटारांची साफसफाई केली गेली नसल्यामुळे अजूनही काही भागांत पाणी तुंबण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे शहरात डासांची उत्पत्ती वाढल्याने हिवताप, मलेरिया आणि डेंग्यूच्या रुग्णांत झपाट्याने वाढ होत आहे. जुलै महिन्यात खारघरमध्ये स्वाईन फ्लूचा एक, डेंग्यूचे चार आणि मलेरियाचे आठ रुग्ण आढळून आले होते, तर ऑगस्ट महिन्यात हीच संख्या अनुक्रमे १३, २८ आणि १२ झाली आहे. गाव परिसर आणि वसाहतीमध्ये सध्या रुग्णवाढ होत आहे. खासगी रुग्णालयांतदेखील ताप, हिवताप आणि डेंग्यूचे रुग्ण मोठ्या संख्येने येत आहेत. याबाबत पालिकेच्या आरोग्य विभागाकडे विचारणा केली असता त्यांनी धुरीकरण आणि फवारणी नियमितपणे केली जात असल्याचे सांगितले.

# आजोबांची सांस्कृतिक आध्यात्मिक कलेचा नातवाने घेतला वसा

**दै.रायगड नगरी । तळा**



तळा तालुक्यातील रहाटाड ता. तळा जी. रायगड येथील कै. हरिभाऊ धर्मा पाटील हे सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रातील अग्रगण्य हे नाव. हयात असताना मु.रहाटाड कोळी समाज प्रमुख म्हणून समाजाचे नेतृत्व करताना त्यांनी श्री गोपाळ कृष्ण भजन व नाट्य मंडळाची स्थापना करून कला क्षेत्रात नाव लौकिक मिळवले आणि अनेक गुणी कलावंत निर्माण केले ग्रंथवाचन,निरूपण, व्यसनमुक्ती तबला, सनई, गायन, समाज सेवक, राजकीय क्षेत्रात जवळीक असे उतुंग अष्टपैलू व्यक्तिमत्व असणारे हरीभाऊ यांचा जीवनप्रवास कार्याचा १९८१ मध्ये शेवट झाला. त्यांची स्मृती त्यांचे नातू सन्मा. खेळाराम कृ. पाटील या वर्षी गणेशोत्सवात जीवनगाथा हा संगीतमय कार्यक्रम मु रहाटाड येथे राधाकृष्ण मंदिरा समोर सुंदर असे रंगमंच तयार करून साजरा केला रहात्या भवनास आजोबांचे नावं देवून ऋण व्यक्त केले या कार्यक्रमास त्यांचे चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमास वाद्यवृंदाने उत्तम संगीत सादर केले रामचंद्र पिसे, गोविंद बसवत, विठोबा चां.कंबू. बुवा (रायगड भूषण)लक्ष्मण धमरी कु.अवंतिका गो. बसवत, मोरेश्वर लाशे बुवा, गोविंद खुटीकर, तुकाराम पां.भगत, विठोबा धुमाळ, एकनाथ तु. घागरुम, सुरेश स.लाशे. या सर्व मान्यवराने कै. हरिभाऊ यांच्या जीवनावर गीते सादर करून सर्व उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. म्हसळा तालुक्यातील खरसई गावचे रामचंद्र म्हात्रे ( रायगड भूषण )यांनी आपल्या ओघवत्यावाणीने जणू हरिभाऊ पाटील यांचे संपूर्ण जीवन चरित्रच उभे केले. या सर्व जीवनगाथा कार्यक्रमाचे उत्तम आयोजन श्री खेळाराम कृष्णा पाटील यांनी दृष्ट लागण्याजोगे करून सर्वांची वाहव्वा मिळवली असा नातू असावा असे जनतेतून प्रशंसा केली या जीवन गाथा कार्यक्रमास उपस्थित, आमंत्रित आणि कलावंतांना शाल, श्रीफळ, पुष्पगुछ आणि !! कलासन्मान !! हे स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास म्हसळा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष अंकुश गाणेकरजी आवर्जून उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देविदास लाशे,मोरेश्वर लाशे यांनी केले हा कार्यक्रमास यशस्वी करण्याकरीता संपूर्ण श्री गोपाळ कृष्ण भजनी मंडळ व नाच मंडळ यांनी श्री खेळाराम कृ. पाटील यांना सहकार्य केले

# कोळी बांधवांच्या प्रामाणिक व मेहनतीपणामुळे गणरायाच्या गळ्यात असलेली सोन्याची चैन पुन्हा मिळाली भक्ताला



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोळी बांधवांच्या प्रामाणिक व मेहनतीपणामुळे विसर्जनाच्या वेळी गणरायाच्या गळ्यात असलेली सोन्याची चैन पुन्हा गणेश भक्ताला मिळाल्याची घटना पनवेल शहरातील कोळीवाडा विसर्जन घाट येथे घडली आहे.

शहरातील रोहिदास वाडा येथे राहणारे मयूर दत्तात्रेय खैरे यांच्या गणपतीचे विसर्जन शहरातील कोळीवाडा येथील विसर्जन घाट येथे करण्यात आले. सदर गणपती आणि गौरी एकत्र असल्याने खैरे कुटुंबीयांनी गणरायाच्या गळ्यात एक तोळे वजनाची सोन्याची चैन घातली होती परंतु सदर चैन गळ्यातून काढण्यास हे कुटुंब विसरले गणरायाचे विसर्जन झाल्यावर त्यांच्या हि बाब लक्षात आली तातडीने मयूर खैरे यांनी त्यांचे मित्र किरण भोईर याला हि गोष्ट सांगितली त्यावेळी गणरायाचे विसर्जन करण्यासाठी विसर्जन घाटावर समर्थ भगत, केतन, अनिकेत व इतर सहकारी उपस्थित होते त्यांना हि बाब समजताच ते पुन्हा खोल खाडी मध्ये उतरले खैरे यांच्या मूर्तीची बैठक वेगळी असल्याने त्या मुलांच्या लक्षात ती मूर्ती होती पाच - सहा मूर्ती पाण्यातून बाहेर काढल्यावर खैरे यांच्या गणेशाची मूर्ती हाती लागली गणेशाच्या गळ्यात जशीच्या तशी होती बाप्पाच्या गळयात घातलेली चैन जशी तशी होती हे पाहून खैरे कुटुंबीयांनी बाप्पा मोरया चा गजर केला व मेहनत घेणाऱ्या कोळी बांधवांचे मनापासून आभार मानले यावेळी पंच कमिटी व स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या उपस्थित सदर चैन खैरे कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यात आली.

# ७५ वर्षानंतरही हाळ खुर्द गावाला दफनभूमीच नाही

**दै.रायगड नगरी । खोपोली**




हाळ खुर्द गावात मुस्लिम समाजाची तीन ते चार हजारांहून अधिक लोकसंख्या असून गेल्या ७५ वर्षात या गावाला हक्काची दफनभूमी (कब्रस्तान) मिळालेली नाही. या गावातील नागरिकांना मयत (मृतदेह) दफन करण्यासाठी एक किलोमीटर अंतरावर असलेल्या खोपोली नगर परिषद हद्दीतील कब्रस्तानात जावे लागते. खोपोली शहराची वाढती लोकसंख्या पाहता हे कब्रस्तान त्यांनाच अपुरे पडत आहे अशा परिस्थितीत हाळ खुर्द येथील स्वतंत्र कब्रस्तान होणे महत्त्वाचे आहे. मात्र, याबाबत ग्राम पंचायत प्रशासन उदासीन असल्याचे दिसून येत आहे.

संपूर्ण देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना एका गावाला दफनभूमी सुद्धा नसावी, ही खरंच खेदजनक बाब आहे. गावाच्या शेजारी तसेच गावाच्या मालकीची अनेक एकर शासकीय जागा असताना त्यातून काही एकर जागा कब्रस्तानासाठी उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे दिसून येत आहे. या गावात मुस्लिम समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे, ग्राम पंचायत सुध्दा गावकऱ्यांच्याच ताब्यात आहे, अधिकतर रहिवासी एकमेकांचे नातेवाईकच आहेत, अशात मुस्लिम समाजाला आपल्या गावातच दफनभूमी (मुस्लिम कब्रस्तान) करिता हक्काची जागा नसणे खरंच संशोधनाचा विषय आहे. दरम्यान, हाळ खुर्द गावाला हक्कांची दफनभूमी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी अखिल भारत जर्नालिस्ट फेडरेशन व पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली (भारत) या संघटनेतर्फे हाळ खुर्द ग्रामपंचायतकडे करण्यात आली आहे.

हाळ खुर्द गावातील ग्रामपंचायतमध्ये अनेक सरपंच , ग्रामसेवक अनेक वर्षांवर्षी अदलाबदली होत असतात. मात्र, आजपर्यंत एकाही पदाधिकारी व शासकीय अधिकाऱ्याने या गावातील मुस्लिम समाजाला दफनभूमी (मुस्लिम कब्रस्तान) मिळावी, यासाठी कोणतेच प्रयत्न केले नसल्याचे दिसून येत आहे. अनेक योजना शासनाकडून ग्रामपंचायतमध्ये येत असतात. पण या योजनेचा लाभ ग्रामस्थांना मिळावा अशी इच्छा ही कधी ग्रामसेवकांची झाली नाही, असेच दिसून येत आहे.

ग्रामपंचायत कार्यालयात कधीही गेल्यास ग्रामसेवक आलेच नाही? मिटींगला गेल्या आहेत? आज येऊ शकल्या नाहीत? कधी कधी तर भरदुपारी ग्राम पंचायतीला कुलूप लावण्यात आलेले असते. या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक नेमके कुणाचे व कोणत्या कामासाठी या ग्रामपंचायत कार्यालयमध्ये आहेत, हा संशोधनाचा विषय आहे. त्यांची नक्की येण्याची व जाण्याची वेळ तरी काय? या मुस्लिम समाजाला असे अधिकारी लाभत असल्यामुळेच हे गाव आजपर्यंत दफनभूमीपासून वंचित राहिले असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. नगर परिषद हद्दीतील एक किलोमीटर अंतरावर असलेल्या कब्रस्तानमध्ये रस्त्यांवरून मयत घेऊन जाताना मोठे अपघात होऊन जीवीतहानी झाल्यावर दफनभूमी होणार का? असा संताप सवाल हाळ खुर्द गावातील ग्रामस्थांकडून विचारला जात आहे.

# काम करण्या पेक्षा काम देणारे उद्योजक बना : डॉ. सतीश मोरे

**दै.रायगड नगरी । कळंबोली**




जीवन हे फार सुंदर आहे त्याकडे फार मोठ्या कल्पकतेने बघा. शिक्षणाच्या फक्त पदव्या घेण्यापेक्षा शिक्षणाबरोबरच आपले डोळे नीट उघडे ठेवून आजूबाजूचे समाज जीवन चांगल्या प्रकारे परीक्षण करा. आई वडिलांनी केलेल्या मेहनतीचे आपल्या जीवनात चीज करून कुठेतरी काम करणारे नोकरदार बनण्यापेक्षा काम देणारे उद्योजक बना असे आवाहन एस.पी .मोरे महाविद्यालयाचे प्रमुख सतीश मोरे यांनी वाशी येथील इंद्रधनुष्य विद्यार्थी स्नेह संमेलना मध्ये केले आहे.

नवीन पनवेल येथील एस.पी .मोरे फाउंडेशनचे विविध शाखांचे विद्यार्थी व पालकांचे स्नेहसंमेलन वाशी येथील विष्णुदास भावे सभागृहात मंगळवारी सकाळी आयोजित करण्यात आले होते. गेल्या सोळा वर्षापासून मोरे महाविद्यालयामध्ये विद्यार्थी व पालकांचे स्नेहसंमेलन केले जात आहे. मात्र कोरोना काळातील दोन वर्षांमध्ये विद्यार्थ्यांचे कलागुणांना व विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाला वाव मिळाला नव्हता. मात्र दोन वर्षाच्या कालखंडानंतर विद्यार्थी व पालकांचे स्नेहसंमेलन आयोजित करून विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांच्या कलागुणांना यावेळी वाव देण्यात आला.

या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन संस्थेचे प्रमुख डॉ. सतीश मोरे यांनी दीपप्रज्वलन करून केले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. ज्योती के. संस्थेच्या संचालिका डॉ.रश्मी चव्हाण व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. या स्नेह संमेलनामध्ये विद्यार्थी व पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या विविध एकपात्री, सामूहिक नृत्य, एकांकिका, कविता व नाट्य सादर करून उपस्थित असणाऱ्या मनमोहित केले.

दोन वर्षा नंतर विविध कार्यक्रम मोठ्या आदबीने व आनंदाने साजरा करून विद्यार्थ्यांनी सर्वांनाच समोहित केले. विद्यार्थ्यांनीही मिळालेल्या संधीचे सोने करीत आपल्या कला चांगल्या प्रकारे प्रदर्शित करून उपस्थितांचे दाद मिळवली.

एस पी मोरे विद्या संकुलाने विद्यार्थी व पालकांचे आयोजित केलेल्या स्नेहसंमेलन बद्दल पालकांनी समाधान व्यक्त करून महाविद्यालयाला धन्यवाद दिले आहेत.

# आठ लाख रुपये किमतीच्या डंपरचा अपहार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महिन्याच्या भाड्याने चालविण्यासाठी दिलेल्या डंपर चा परस्पर स्वतःच्या फायद्यासाठी डंपर मालकाचा विश्वासघात करून सदर डंपर चा अपहार केल्याची घटना पनवेल जवळील पारगाव येथे घडली आहे.

पारगाव येथे राहणारे विजय मेहेर यांच्या नावावर असेलला आठ लाख रुपये किमतीचा टाटा कंपनीचा डंपर क्रमांक एम एच ४६ बी बी १०६८ हा महिन्याच्या भाड्याने चालविण्यासाठी गोविंद फडतरे यांच्याकडे ताब्यात दिला असता त्यांनी तो डंपर नेऊन परत न करता स्वतःच्या फायद्यासाठी विजय मेहेर यांचा विश्वासघात करून सदर डंपर चा अपहार केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# कोलाड विभागात साखर चौथ गणेशोत्सव ११ सार्वजनिक तर १९ खाजगी गणेश बाप्पा विराजमान

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**



गौरीं गणपती उत्सवानंतर पुन्हा गणेश भक्तांना वेध साखर चौथ गणपती उत्सवाचे लागले असून कोलाड विभागात व कोलाड पोलीस थाने हद्दीत येथील ग्रामस्थ व विविध युवक मंडळ एकत्रित येऊन यांच्या वतीने मंगळवार १३सप्टेंबर रोजी संकष्टी चतुर्थी निमित्ताने साखर चौथीचे खाजगी घरगुती १९ व सार्वजनिक ११ गणेश मूर्तीची स्थापना करत विराजमान करत मोठ्या उत्साह वातावरणात हा उत्सव मोठ्या आनंदाने भक्तिमय वातावरणात साजरा होत असतांना दिसत आहे.

मंगळवारी कोलाड विभागात उत्सवा ठिकाणी दीड दिवसांचे गणपती बाप्पांचे वाजत गाजत साखर चौथ गणपती बाप्पांचे मोठ्या उत्साह वातावरणात आगमन करत मोठ्या भक्ती भावाने व आनंददायी वातावरणात विराजमान केले आहेत गेली अनेक वर्षे या विभागात विविध ठीक ठिकाणी साखर चौथ गणपती उत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा केला जातो त्यामुळे गौरी गणपती उत्सव काळानंतर साखर चौथ गणपती उत्सव हा काही गावात सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात

कोलाड विभाग परिसरात व कोलाड पोलीस थाने हद्दीत साखर चौथ गणपती उत्सवात एकूण ३० गणपती बाप्पांचे आगमन होत ठीक ठिकाणी हा उत्सव साजरा करण्यात येत असून यात १९ सार्वजनिक व ११ खाजगी घरगुती गणेश मूर्तीची स्थापना करत हा उत्सव साजरा केला जात असल्याची माहिती कोलाड पोलीस उप निरीक्षक सुभाष जाधव यांनी दिली आहे.



गौरा गणेश उत्सव– राजमुद्रा मित्र मंडळ, कुंभारवाडा युवक मंडळ, पनवेल



पनवेल शहरातील परदेशी आळी येथील नवनाथ मित्र मंडळाचा राजा



पनवेल मिरची गल्ली येथील उमाकांत शेट्ये यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले श्री गणराज



दिघोडे येथील भाजपचे सरपंच सौ. सोनिया मयूर घरत यांच्या घरातील गौरा गणेशाची आकर्षक मूर्ती



निलेश बामा पाटील–भाजपा कार्यकर्ते दिघोडे तथा रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व्यवस्थापन अध्यक्ष यांच्या घरातील गौरा गणेशाची आकर्षक मूर्ती



भेंडखळ येथील श्री लिलेश्वर ठाकूर यांच्या घरातील गौरा गणपतीची आकर्षक मूर्ती



रोहा तालुक्यातील रोठखुर्द गावचे सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र (भाई) मोरे यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या २१ दिवसांच्या गणरायाचे दर्शन घेताना राष्ट्रिय काँग्रेस रोहा तालुका युवक अध्यक्ष अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, किल्ला गावचे माजी सरपंच चंद्रकांत बामुगडे.

## संक्षिप्त...

## कोकण विभागीय लोकशाही दिनी ०१ अर्ज निकाली

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

कोंकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये उपायुक्त (विकास) श्री.गिरीष भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली.

यावेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या ०४ असून आज आलेल्या अर्जांची संख्या ०४ असे एकूण प्राप्त अर्ज ०८ होते. त्यापैकी आज ०१ अर्ज निकाली काढण्यात आले. आज रोजी ०७ तक्रारी प्रलंबित आहेत.

## राकेश मोकल यांनी स्वखर्चाने बांधले गडब, कारावी येथे बस थांबे

**दै.रायगड नगरी । पेण**


पेण तालुक्यातील काराव– गडब ग्रामपंचायत हद्दीतील मुंबई – गोवा महामार्गावर गडब, कारावी या गावाजवळ गेली तिन चार वर्षे बस थांब्याची निवारा शेड नव्हती. त्यामुळे भरपावसात किंवा उन्हात प्रवाशांना एसटीची अथवा अन्य वाहनांची वाट पाहात राहावे लागत आसल्याने ही गैरसोय ओळखुन कारावी गावचे शिवसेनेचे पेण तालुका युवासेना अधिकारी राकेश मोकल यांनी स्वखर्चाने गडब व कारावी येथे निवाराशेड बांधल्या.

दररोज कारावी व गडब या ठिकाणावरुन शेकडो प्रवासी पेण, मुंबई या ठिकाणी प्रवास करत आसतात मात्र या ठिकाणी निवारा शेड नसल्याने प्रवाशांना अडचणी येत होत्या ही गैरसोय लक्षात घेता राकेश मोकल यांनी ठिकाणी निवारा शेड स्वखर्चाने बांधली गेली आसल्याने येथील प्रवाशांची गैरसोय दुर झाल्याचे एकच ध्यास गडबचा विकास संघटनेचे दिनेश म्हात्रे यांनी सांगितले.

## हनुमान कोळीवाडा ग्रामस्थ कायम स्वरूपी आपल्या मुळ गावी शेवा कोळीवाडा गावात राहायला जाणार

**दै.रायगड नगरी । उरण**

शेवा कोळीवाडा गावातील ग्रामस्थांचे पुनर्वसन न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण पसरले आहे. वर्षानुवर्षे शासनाने ही महत्वाची समस्या तशीच प्रलंबित ठेवल्याने या ग्रामस्थांचा जीवन मरणाचा प्रश्न उभा राहिला आहे. पुनर्वसन न झाल्याने शासनाचा निषेध करत हनुमान कोळीवाडा ग्रामस्थ कायम स्वरूपी आपल्या मूळ गावी शेवा कोळीवाडा गावात राहायला जाणार आहेत तसा ग्रामसभेत ठराव सुद्धा पारीत करण्यात आला आहे. जेएनपीटीच्या प्रकल्पसाठी शेवा कोळीवाडा गावातील जमीन संपादन करण्यात आली होती. त्याबद्दल्यात ग्रामस्थांचे पुनर्वसन करण्याचे व इतर सेवा सुविधा पुरविण्याचे जेएनपीटी प्रशासनाने ग्रामस्थांना आश्वासन दिले होते. त्या आश्वासनांची वर्षानुवर्षे पूर्तता होत नसल्याने हा विषय आता आणखीनच गंभीर झाला आहे. हा विषय आणखीनच चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने हा विषय त्वरित सोडवावा अशी मागणी



हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांसह उरण मधील विविध सामाजिक संघटनानी प्रशासनाकडे केली आहे.

उरण तालुक्यात JNPT प्रकल्प जेथे उभा रहाणार होता तेथे शेवा कोळीवाडा, उरण, रायगड हे गाव होते. त्या गावाची शेवा कोळीवाडा ग्रामपंचायत होती. ती JNPT ला नको होती. म्हणून JNPT ने दुसऱ्या टप्प्यासाठी शेवा कोळीवाडा गावठाण लागणार आहे हे खोटे कारण सांगून सरकारकडे शेवा कोळीवाडा गावठाण मागितले होते.गेल्या ३७ वर्षात शेवा कोळीवाडा गावठाण JNPT ला लागले नाही,आणि भविष्यात लागणार नाही. असे असताना सरकारने JNPT वर विश्वास ठेवला होता. सरकारला गच्छद्रढ ने शेवा कोळीवाडा गा–वाचे पुनर्वसनाची खर्चाची हमीची लेखी जबाबदारी सरकारला १२ नोव्हेंबर १९८२ रोजी दिली होती. ती गेल्या ३७ वर्षात कागदावरच आहे. सरकारच्या सन १९८४ च्या जनगणने नुसार शेवा कोळीवाडा गावातील ८६ शेतकरी व १७० बिगर शेतकरी अशा एकूण २५६ कुटुंबांचे पुनर्वसन करण्याचे जाहीर केले होते. त्यांचे बोरीपाखाडी उरण येथे १७ हेक्टर जमिनीत शासनाचे माप दंडानंदाने पुनर्वसन करण्याचे ०८/०८/१९८५ ला मंजूर होते. पण JNPT ने फंड न दिल्याने आजतागायत ३७ वर्षे झाले तरी पुनर्वसन झालेले नाही. सरकारने शेवा कोळीवाडा गावातील ८६ शेतकरी व १७० बिगर शेतकरी अशा एकूण २५६ कुटुंबांना बोरीपाखाडी उरण येथील १७ हेक्टर जमिनी पैकी फक्त ९१ गुंठे जमिनीत संक्रमण शिबिरात ठेवलेले आहे. रोजीरोटीसाठी पर्यायी संपदा (नोकरी) दिलेली नाही. JNPT ने शेवा कोळीवाडा गावातील लोकांच्या जमिनी, साधन संपदा व घरे दारे सर्व हिरावून घेऊन ही शासनाच्या मापदंडानुसार पुनर्वसन करत नसल्याने आणि JNPT कडुन होत असलेला मानवी हक्कांचा छळ असह्य झाल्याने हनुमान कोळीवाडा (शेवा कोळीवाडा) गावातील ग्रामस्थांनी माननीय लोकायुक्त महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक ११ जुलै २०१७ रोजीच्या आदेशानुसार ग्रामसभेत मूळ शेवा कोळीवाडा गावात कायमस्वरूपी रहायला जाण्याचा निर्णय घेऊन ठराव मंजूर केलेला आहे.

## राहत्या घरातून सोन्याच्या दागिन्यांची पिशवी केली लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घराचा दरवाजा उघडा ठेवल्याचा फायदा अज्ञात चोरट्याने घेऊन घरातील सोन्याच्या दागिन्यांची पिशवी चोरी केल्याची घटना शहरातील लक्ष्मी वसाहत येथे घडली आहे.

श्रीमती माया लहाने यांच्या घराचा दरवाजा उघडा ठेवल्याचा फायदा अज्ञात चोरट्याने घेऊन घरातील सोन्याच्या दागिन्यांची पिशवी ज्यामध्ये जवळपास एक लाख साडे सहा हजार रुपये किमतीचे वेगवेगळ्या प्रकारचे दागिने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा' निमित्त १५ सप्टेंबर रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

### जात प्रमाणपत्र पडताळणी आणि शिष्यवृत्ती संदर्भात मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयाच्यावतीने नवीमुंबई पसिसरातील शैक्षणिक संस्था व महाविद्यालयात जात प्रमाणपत्र पडताळणी आणि शिष्यवृत्तीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दि. १५ सप्टेंबर २०२२ रोजी दु. ३.०० वाजता नवीमुंबई येथील कोकण भवन इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील बैठक कक्षात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सामान्य नागरिकांच्या तक्रारी व अर्जांवर कालमर्यादेत निपटारा व्हावा यासाठी राज्यात १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या कालावधीत 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा' आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या सुचनांनुसार या पंधरवड्यामध्ये नागरिकांचे प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालयाने नवीमुंबई परिसरातील महाविद्यालये, तंत्रनिकेतन, वैद्यकीय, नर्सिंग, विधी, आर्किटेक्चर महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी तसेच शिष्यवृत्ती संबंधित कामकाज पाहणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेत जात प्रमाणपत्र पडताळणीच्या कार्यपध्दतीबाबत समितीचे सदस्य मार्गदर्शन करणार आहेत. तसेच या कार्यशाळेत विद्यार्थ्यांकडून जात वैधता प्रमाणपत्राचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणे, जात वैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रे व पुराव्यांबाबत सविस्तर माहिती दिली जाणार आहे. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास मदत होणार आहे.

नवमुंबई परिसरातील महाविद्यालये, तंत्रनिकेतन, वैद्यकिय, नर्सिंग, विधी, आर्किटेक्चर महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी तसेच शिष्यवृत्ती संबंधित कामकाज पाहणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या कार्यशाळेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य श्री. वासुदेव पाटील यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

## अंगारक संकष्ट चतुर्थी निमित्ताने स्वयंभू महागणपती चरणी भक्तांची मांदियाळी

**दै.रायगड नगरी । उरण**

हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या चिरनेर गावातील श्री महागणपती चरणी नतमस्तक होण्याचा योग भाविकांसाठी मंगळवारी ( दि१३) आलेल्या अंगारक संकष्ट चतुर्थी निमित्ताने जुळून आला. त्यामुळे श्री महागणपती चिरनेर चरणी नतमस्तक होण्यासाठी नवीमुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, पनवेल, पेण व उरण येथील अनेक भक्तांनी आप आपल्या कुटुंबासह मंदिरात श्रीच्या दर्शनासाठी गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळत होते .

उरण तालुक्यातील चिरनेर या गावावर निसर्ग देवतेची अविरत कृपा आहे. या गावातील जनतेने २५ सप्टेंबर १९३० साली ब्रिटिश सरकार विरोधात सत्याग्रह पुकारुण देशाच्या स्वातंत्र्यासाठी गावकऱ्यांनी हुतात्म्ये पत्करले होते. गावात असणारे स्वयंभू महागणपती देवस्थान चिरनेर गावचे ग्रामदैवत आहे. शिलाहार राजवटीत निर्मिलेले महागणपती मंदिर ततत्कालीन मुस्लिम आक्रमकांनी उध्वस्त केले मात्र तत्पूर्वी गणेशभक्तांनी महागणपतीची मूर्ती मंदिरा जवळील तलावात सुरक्षित लपवून ठेवली होती. तद्नंतर पेशव्यांचे सरदार रामजी महादेव फडके यांना देवाने स्वप्नात येऊन मला तलावातून बाहेर काढ असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी तलावाचे खोदकाम करून मूर्ती बाहेर काढली. आणि नविन पाषाणी भव्य मंदिरात मूर्तीची प्रतिष्ठापना केली. महागणपतीचे मंदिर पाषाणी, गोल घुमटाचे असून पूर्वाभिमुख आहे. मंदिरात स्थानापन्न असलेली महागणपतीची मूर्ती भव्य, चतुर्भुज, शेंदूर चर्चित असून पद्मास–नात बसलेली आहे. मूर्तीच्या हाती खड्ग व पाश आहेत. मूर्ती सुमारे सहा फूट उंच व साडेतीन फूट रुंद आहे.

नवसाला पावणारा गणपती म्हणून चिरनेर गावातील महा–गणपतीची ख्याती सर्वदूर पसरली आहे. या गणेशाच्या दर्शनाला व हुतात्म्यांच्या बलिदानातून पावन झालेल्या भूमीचे दर्शन घेण्यासाठी नेहमीच भाविकांची व पर्यटकांची गर्दी असते, अशा लाडक्या श्रींच्या चरणी नतमस्तक होण्याच भाग्य भाविकांना मंगळवार दि१३ सप्टेंबर २०२२ रोजी आलेल्या अंगारक संकष्ट चतुर्थी निमित्ताने जुळून आला. त्यामुळे उरण, पनवेल प्रमाणे नवी मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवली, पेण मधिल भाविकांनी श्री गणेशाच्या मंदिरात दर्शनार्थ पहाटेच्या सुमारास ये– जा करत होते, यावेळी मंदिरात श्रीचे अभिषेक, सकाळी काकड आरती, भजन आदि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी भक्तगण भावनिक वातावरणात तलीन झाले होते. दूर दूर वरून येणारे भाविक हे चिरनेरच्या मातीतील भांडी, माजी पाल यांची चव चाखण्यासाठी आप आपल्या घरी घेऊन जाताना दिसत होते.



## पनवेल ज्येष्ठ नागरिक संघाचा उटणे प्रकल्प

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे पनवेल शहर ज्येष्ठ नागरिक संघाचे उटणे प्रकल्प बंद केला होता. या काळांत सर्वच कार्यक्रम बंद असल्याने उत्पन्नाची सर्व साधने बंद होती, मात्र आता कोरोनाची साथ आटोक्यात येत असून सर्व कार्यक्रम शासनाने खुले केले असल्याने, पनवेल ज्येष्ठ नागरिक संघाच्या नव्या कार्यकारिणीने पुनःश्च दिवाळीसाठी उटणे प्रकल्प व मकर संक्रांतीसाठी तिळगुळ बनविण्याचा संकल्प केला आहे.

संघाने बनविलेल्या उटण्याची संघाच्या सभासदांबरोबरच शहरा–तील अनेक कुटूंबाकडून गेली दोन वर्षे मागणी होत होती, तसेच काही संस्थांकडूनही संघाच्या या प्रकल्पाला उदंड प्रतिसाद लाभला होता. संघाच्या या प्रकल्पांतून सभागृहाच्या व्यवस्थेस आर्थिक हातभार लागत होता. हा प्रकल्प संघाचे सर्व सभासद राबवीत असल्याने आता पुन्हा एकदा संघाच्या उटण्याचा घमघमाट व तिळगुळाचा गोडवा लाभणार आहे. सभासदांनी प्रत्यक्ष हजर राहून या प्रकल्पांना पूर्वीच्या सहकार्याप्रमाणेच साहाय्य करावे, असे आवाहन संघाचे अध्यक्ष जयंत गुर्जर व सचिव सुनिल खेडेकर यांनी केल्याचे अनंत सिंगासने यांनी सांगितले.